


पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

७६ वर्ष स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com




■ वर्ष ७६ वे/अंक २८ वा ■ ■ अमरावती, सोमवार, दिनांक १५ सप्टेंबर २०२५ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर २४ भाद्रपद १९४७ ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.०० ■







## भारताचा पाकिस्तानवर सर्जिकल स्ट्राइक

### एकतर्फी सामन्यात पाकड्यांना धुळ चारली, जगासमोर मुसक्या आवळल्या



दुबई दि. १४ : सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने पाकिस्तानवर सर्जिकल स्ट्राइक केला. क्रिकेटच्या मैदानात झालेल्या या ऑपरेशन सिंदूरच्या पुढच्या भागामध्येही भारत यशस्वी ठरला. भारताने जगासमोर पुन्हा एकदा पाकिस्तानच्या मुसक्या आवळल्या आणि मैदान कोणतेही असो, सरस कोण आहे हे सर्वांना दाखवून दिले. पहिल्या चेंडूपासून भारताने पाकिस्तानवर अंकुश ठेवला आणि त्यामुळेच भारताला पाकिस्तानला सर्वांसमोर धुळ चारता आली. भारताने अचूक गोलंदाजी करताना पाकिस्तानला १२७ या माफक धावसंख्येवर रोखले आणि त्यानंतर धडाकेबाज फलंदाजी करत त्यांचा फडशा पाडला. भारताने या सामन्यात पाकिस्तानवर सात विकेट्स राखून दमदार विजय साकारला. तिलक वर्मा आणि अभिषेक शर्मा यांनी या सामन्यात प्रत्येकी ३१ धावा केल्या.

पहिल्याच चेंडूवर हार्दिक पंड्याने पाकिस्तानला धक्का दिला. *(पान २ वर)*

## भारतातील अनेक राज्यांना भूकंपाचा जोरदार धक्का

नवी दिल्ली दि. १४ : रविवारी दुपारी भारतातील अनेक राज्यांमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले. पश्चिम बंगालमधील सिलिगुडीसह उत्तर बंगालमध्ये भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. भूकंपाची तीव्रता ५.९ इतकी होती. या भूकंपाचे केंद्र आसाममधील उदलगुरी जिल्ह्यात होते.




जर्मन रिसर्च सेंटर फॉर जिओसायन्स नुसार, रविवारी दुपारी २:४१ वाजता ईशान्य भारतात ५.९ तीव्रतेचा भूकंप झाला. भूकंपाचे केंद्र जमिनीपासून फक्त १० किमी खोलीवर होते. या भूकंपाचे धक्के आसाममधील गुवाहाटीसह अनेक भागात जाणवले. उत्तर बंगालमधील सिलिगुडीमध्येही जाणवले. भूकंपाचे धक्के भूतान आणि बांगलादेशच्या उत्तरेकडील भागांपर्यंत पोहोचले.

आसामच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, कोणत्याही प्रकारची जीवित किंवा वित्तहानी झाल्याचे तात्काळ वृत्त नाही. भूकंपामुळे झालेल्या जीवित आणि वित्तहानी घटनेवर स्थानिक प्रशासन लक्ष ठेवून आहे.

दुसरीकडे. रविवारी दुपारी कर्नाटकच्या रायचूर जिल्ह्यात २.७ रिश्टर स्केल तीव्रतेचा सौम्य भूकंप झाला. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्र (एनसीएस) नुसार, भूकंप दुपारी १:४४ वाजता झाला. त्याचे केंद्र रायचूरजवळ १६.०४ उत्तर अक्षांश आणि ७६.६३ पूर्व रेखांशावर होते. भूकंपाची खोली सुमारे १० किलोमीटर होती.



रविवारी महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे मुंबईतील राजभवन येथे आगमन झाले. यावेळी महाराष्ट्रातील तमाम जनतेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी त्यांचे स्वागत केले

## ओबीसी असो किंवा मराठा असो, सगळ्या समाजाचे हित हेच सरकार करू शकते : फडणवीस



मुंबई दि.१४ : दोन्ही बाजूंनी राजकारण चाललेले आहे. आम्ही काढलेला जीआर ओबीसींच्या कोणत्याही हक्कांवर गदा आणणारा नाही. एकही नकली व्यक्ती ओबीसीमध्ये समाविष्ट होणार नाही. ओबीसी नाही, असा कोणताही व्यक्ती समाविष्ट होणार नाही, अशा प्रकारची काळजी त्या जीआरमध्ये घेतलेली आहे, याचा पुनरुच्चार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

राज्य सरकारने काढलेल्या जीआरबाबत ओबीसी नेत्यांनी तीव्र आक्षेप घेत टीका केली. पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांच्या टीकेचे स्पष्ट शब्दांत उत्तर *(उर्वरीत पान २ वर)*

### ओबीसीत एकही नकली व्यक्ती सामाविष्ट होणार नाही : फडणवीस

राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून राजकारण तापलं आहे. राज्य सरकारच्या जीआरमुळे ओबीसी नेत्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. मंत्री छगन भुजबळ यांच्याकडून सरकारच्या जीआरचा सातत्याने विरोध होत आहे. याच वादावर मुख्यमंत्री *(पान २ वर)*

## शेती, परराष्ट्र धोरण ते आरक्षण

### शरद पवारांचा केंद्रासह राज्य सरकारवर हल्लाबोल

नाशिक दि. १४ : आज केंद्र सरकार शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करत आहे. शेतीला भाव नाही. कांदा निर्यातीवर बंधने आहेत, असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रमुख शरद पवार यांनी सरकारवर टीका केली. एवढा मोठा जिल्हा असताना देखील या शेतकऱ्यांची नाशिक जिल्हा बँक आजारी आहे. प्रचंड थकबाकी झाली आहे. आज केंद्रातील सत्ता ज्यांच्या हातात आहे ते शेतकऱ्यांच्या प्रश्नावर गंभीर नाहीत. त्यामुळं शेतकरी संघटना अधिक प्रभावी करणे गरजेचे आहे असे शरद पवार म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे एकदिवसीय प्रशिक्षण शिबिर नाशिकमध्ये पार पडत आहे. या कार्यक्रमात ते बोलत होते.



नाशिकच एक वैशिष्ट म्हणजे उत्तम शेती करणारा हा जिल्हा आहे. शेतीवर नाशिककरांचे लक्ष आहे. आधुनिक शेतीचा विचार करणारा हा शेतकरी आहे. नवनवीन प्रयोग इथ पाहायला मिळतात. महाराष्ट्रातील शेतकरी संघर्ष करण्यासाठी रस्त्यावर उतरला होता, शरद जोशी यांच्या नेतृत्वात शेतकरी रस्त्यावर उतरला होता याची सुरुवात नाशिकमध्ये झाली होती असं पवार म्हणाले. कांद्याचे सोयाबीनचे उत्पन करणारा जिल्हा म्हणजे नाशिक आहे. भारत हा कृषी प्रधान देश आहे, त्याला जोडधंदा हा दुधाचा आहे. शेतीतील गोष्टी आपण अमेरिकडून घ्यायला लागलो तर शेती अडचणीत येईल असे शरद पवार म्हणाले. राज्यात १ हजार १८३ शेतकऱ्यांनी महाराष्ट्रात आत्महत्या केल्या आहेत. यामध्ये विदर्भातील शेतकरी जास्त आहेत. राज्य सरकार बघ्याची भूमिका घेत असेल तर अवघड आहे असे पवार म्हणाले. लोकसभा निवडणुकांत भास्कर भगरे, *( पान २ वर)*

## आईवरची टीका आणि पीएम मोदींचे सडेतोड प्रत्युत्तर : मी शिवभक्त, विष गिळून टाकतो



गुवाहाटी दि. १४ : पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आसामच्या दौऱ्यावर होते. यादरम्यान त्यांनी स्वतःला भगवान शिवभक्त म्हणून वर्णन केले. ते म्हणाले की, कोणी मला कितीही शिव्या दिल्या तरी मी सर्व विष गिळतो. काँग्रेस पक्षावर टीका करताना ते म्हणाले की, माझे एकमेव नियंत्रण देशातील १४० कोटी जनता आहे, ते माझे स्वामी आहेत. पंतप्रधान मोदींनी काँग्रेसवर भूपेन हजारिका यांचा अपमान केल्याचा आरोप केला. ते म्हणाले की, भाजपचे 'डबल इंजिन' *(पान २ वर)*

## भाजपा १४ कोटी सदस्यांसह बनला जगातील सर्वात मोठा पक्ष

नवी दिल्ली दि. १४ : भारतीय जनता पक्षाचे (भाजप) राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी रविवारी सांगितले की, भाजप १४ कोटी सदस्यांसह जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष बनला आहे. ते म्हणाले की, भाजपचे दोन कोटी सक्रिय सदस्य आहेत.



जेपी नड्डा यांनी माहिती दिली की, पक्षाचे देशभरात २४० लोकसभा सदस्य, सुमारे १५०० आमदार आणि विधान परिषदांमध्ये १७० हून अधिक सदस्य आहेत. केंद्रीय मंत्र्यांनी आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे पक्षाच्या रॅलीला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सरकारचे कौतुक केले.


ते म्हणाले, आम्ही (भाजप) १४ कोटी सदस्यांसह जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष आहोत. भारतात २० राज्यांमध्ये एनडीएची सरकारे आहेत आणि १३ राज्यांमध्ये भाजपची सरकारे आहेत. आम्ही देशातील सर्वात मोठा प्रतिनिधी पक्ष आहोत. आमचे २४० खासदार (लोकसभा) आहेत. आमचे सुमारे १,५०० आमदार *(पान २ वर)*

## अपघातात एकाच कुटुंबातील सात जणांचा मृत्यू

जयपूर दि. १४ : राजस्थानमधील जयपूर शहराजवळील वाटिका रिंग रोडवर रविवारी रात्री उशिरा एक भीषण रस्ते अपघात झाला असून, या अपघातात एकाच कुटुंबातील सात जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये दोन लहान मुलांचाही समावेश आहे. सर्व जण हरिद्वारहून अस्थिविसर्जन करून परत येत होते, तेव्हा हा *(उर्वरीत पान २ वर)*






















■ www.dainikhindusthan.com ■ फोन : २६६०४२९/२६६६४६४ ■ फॅक्स ०७२१-२६६३३६० ■ इ-मेल : dainikhindusthanpress@gmail.com ■ आर.एन.आय.क्र. ११४२०/५७ ■ पोस्टल रजि.नं. ए.एमटी./आर.एन.पी./८५/२०१८-२०२० ● अमरावती ● यवतमाळ ● अकोला ● बुलढाणा ● वाशिम